ePaper

**अबू आझमींकडून औरंगजेबचे गुणगाननंतर मुलगा फरहानची गुंडगिरी समोर!**



॥ वर्ष - 8 ।अंक - 228 ॥UDYAM-MH-26-0158827 ॥

# महाईन्यूज™

www.mahaenews.com | बुधवार, दि. 5 मार्च 2025 | पुणे आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

**आतील पानांत**

- भारताचा ऑस्ट्रेलियावर विजय!
- विजयाचा पाकिस्तानला धक्का
- राम मंदिरावर दहशतवादी हल्ल्याचा कट
- मियाँ, म्हणणे हा अवमान नाही

## ‘बैल गेला आणि झोपा केला’ खासदारांची अवस्था

# हाल आँखो देखा; रोहिंग्यांचा पाठीराखा?

## डॉ. कोल्हे यांचे ‘मगरीचे अश्रू’ दिसले, हिंदूंच्या डोक्यात घुसले !

। पिंपरी-चिंचवड
। महाईन्यूज । अविनाश आदक

**शिरूर लोकसभा मतदारसंघातील ‘डबल ढोलकी’ खासदाराने नेहमीप्रमाणे वाराती मागून घोडे, अशी भूमिका घेतली आहे. कुदळवाडी येथे ज्यावेळी अग्नितांडव सुरू होते, त्यानंतर तेथील अनधिकृत बांधकामे पाडली जात होती. त्यावेळी पुरोगामी सूर आळवत त्या जोरावर मते मिळवणारे खासदार कुठे होते, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.**



म्हणतात ना..’बैल गेला आणि झोपा केला’ तशी या नकली ‘कर्तव्यशून्य’ खासदाराची अवस्था आहे. केवळ ‘मगरीचे अश्रू’ ढाळत त्यांनी पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या आयुक्तांना पत्र दिले असून, या परिसरातील नागरिकांबाबत आपल्याला फारच पुळका आणि काळजी असल्याचे दाखवले आहे.

चिखली, कुदळवाडी परिसरात अनेक बेकायदा धंदे, बेकायदा इमारती, बेकायदा मशिदी उभ्या राहत होत्या, तेथे नंतर कारवाई सुरू होती, त्यावेळी हे खासदार साहेब, कोणत्या बिळात तोंड लपवून बसले होते ? या प्रकरणातील त्यांची संपूर्ण भूमिका ही संशयास्पद असून या भागातील अवैध धंदे, बेकायदा चलनाची आवक आणि येथे राहणारे रोहिंग्या तसेच बांगलादेशी नागरिक यांना या खासदार महाशयांचा पाठिंबा तर नाही ना, अशी शंका नागरिक सुद्धा घेऊ लागले आहेत. त्यांच्यामुळे हा भाग अशांत टापू बनला होता का? असाही प्रश्न आहे.

### पत्रात नेमके काय ?

उशिरा जाग्या झालेल्या खासदार महाशयांनी दि. ३ मार्च रोजी आयुक्त मा. शेखर सिंह यांना पत्र लिहिले असून, विविध प्रकारची माहिती मागवली आहे. ही कारवाई 7 फेब्रुवारीला सुरु झाली होती. मुख्य विषय हा चिखली आणि कुदळवाडी भागातील अनधिकृत बांधकामे, कर वसुली तसेच लघुउद्योगांवर झालेल्या परिणामांबाबत सविस्तर अहवाल उपलब्ध करून देण्याबाबत त्यांनी विनंती केली आहे.



### कारवाई संदर्भात अनेक प्रश्न

खासदार कोल्हे यांनी आपल्या पत्रामध्ये या परिसरातील अनधिकृत बांधकाम कारवाई संदर्भात अनेक महत्त्वाचे प्रश्न उपस्थित होत आहेत, असे म्हटले आहे. याशिवाय करवसुली आणि महापालिका हद्दीतील लघु उद्योगांवरील परिणाम याचीही त्यांनी काळजी व्यक्त केली आहे.

### जबाबदारी घेणारे आमदार, बेजबाबदार खासदार?

प्रत्यक्षात, भाजपाचे आमदार महेश लांडगे हे या कारवाईच्या दरम्यान पूर्णपणे सतर्क होते. त्यांनी कारवाईचे जाहीर समर्थन केले. पण, सरसकट कारवाईमुळे भूमिपुत्र आणि लघु उद्योजक यांचे नुकसान का केले? असा जाब प्रशासनाला विचारला. दुसरीकडे, या भागाचे बेजबाबदार खासदार मात्र नेहमीप्रमाणे बेपत्ता होते. आता ते ‘उगवले’ आहेत आणि जाब विचारू लागले आहेत. त्यामुळे आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

### पुतनामावशीची काळजी, कोरडी सहानुभूती..

खासादर अमोल कोल्हे हे निवडणुकीपूर्वी किंवा नंतर कधीच फिरकत नाहीत आणि आता कोरडी सहानुभूती व्यक्त करण्यासाठी पत्र लिहीत आहेत. त्यांना या परिसरात बेकायदा राहात असलेल्या मुस्लिमांची काळजी आहे. हिंदूंचे अनेक सण किंवा आळंदीचे महत्त्वाचे सणाचे दिवस ते नेहमीच चुकवतात. पण, या पत्रात त्यांनी लिहिले आहे की प्रशासनाच्या चुकीमुळे या भागात जवळपास पाचशेपेक्षा जास्त लघुउद्योग उद्ध्वस्त झाले आहेत, त्यांची नुकसान भरपाई देण्यात येणार आहे का? तसेच करसंकलनाच्या वेळी संबंधित आस्थापनांना अनधिकृत बांधकामाबद्दल पूर्वसूचना देण्यात आली होती का? त्यांचे हे पत्र म्हणजे उशिरा जाग आल्याचा परिणाम आहे. घटना घडली कधी ? आपण विचारतो कधी? प्रत्यक्ष घटना घडत असताना हे झोपले होते, हेच यावरून सिद्ध होत आहे.

# पवना धरणांच्या परिसरात अतिक्रमणे!

## जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांची कबुली

। पुणे ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**खडकवासला आणि पवना धरणांच्या जलाशयांच्या प्रतिबंधीत क्षेत्रात अतिक्रमणे झाल्याची कबुली राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी मंगळवारी विधानपरिषदेत दिली. अतिक्रमण करणाऱ्यांना वेळोवेळी नोटीसा बजाविण्यात आल्या असून पोलीस यंत्रणेच्या माध्यमातून अतिक्रमणे काढून टाकण्याची कार्यवाही करण्यता येत असल्याचेही विखे-पाटील यांनी सांगितले.**



विधिमंडळाच्या अधिवेशनात आमदार राजेश राठोड, अशोक उर्फ भाई जगताप, अभिजित वंजारी, डॉ. प्रज्ञा सातव, धीरज लिंगाडे यांनी विधानपरिषदेमध्ये खडकवासला आणि पवना धरण परिसरातील अतिक्रमणांचा मुद्दा तारांकित प्रश्नाद्वारे उपस्थित केला. त्यावर उत्तर देताना विखे पाटील यांनी ही कबुली दिली. खडकवासला आणि पवना या धरणांच्या जलाशयांच्या क्षेत्रातील जलसंपदा विभागाच्या सुमामे एक हजार एकर जमिनीवर अतिक्रमण झाले असून दोन्ही धरणांच्या अतिक्रमण केलेल्या जागांवर पाचशेहून अधिक बंगले, लॉन, रिसॉर्ट उभारण्यात आले आहेत. तसेच भराव घालून बेकायदा जमीन हस्तगत करण्यात आली आहे. त्यामुळे धरमातील पाणी साठविण्याची क्षमता कमी झाली असून जिल्ह्यातील पाणीपुरवठ्यावर त्याचा परिणाम होत आहे का, आणि जलाशयांच्या क्षेत्रातील अतिक्रमणे काढण्यासाठी जलसंपदा विभागाने कोणती कारवाई केली आहे, अशी विचारणा विधानपरिषदेत आमदारांनी केली. 'खडकवासला आणि पवना धरणाच्या जलाशयांच्या बुडीत क्षेत्रात आणि जलसंपदा विभागाच्या हद्दीत कोणतीही बांधकामे झालेली नाहीत. मात्र, जलाशयांच्या प्रतिबंधित क्षेत्रात अतिक्रमणे झाल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे संबंधितांना वेळोवेळी रितसर नोटीसा बजाविण्यात आल्या आहेत. पोलीस यंत्रणेच्या माध्यमातून अतिक्रमणे हटविण्याची कार्यवाही करण्यात येत आहे,' असे विखे-पाटील यांनी सांगितले. ते म्हणाले की, खडकवासला आणि पवना धरणाच्या पाण्याखालील क्षेत्रात अतिक्रमणे झालेली नाहीत. धरणांमधील पाणी साठवण कमी झाली नसून जिल्ह्यातील पाणीपुरवठ्यावर कोणताही परिणाम झालेला नाही. धरण आणि कालव्यांच्या परिसरात झालेल्या अतिक्रमणांसंदर्भात महसूल आणि वन विभागा, गृह विभाग आणि महापालिकेने संयुक्त कारवाई करावी, अशी सूचना यापूर्वीच पुण्यात जानेवारी महिन्यात झालेल्या कार्यशाळेत संबंधितांना देण्यात आली आहे. धरण जलायशाच्या बाजूने असणाऱ्या अतिक्रमणांना नोटीस बजाविण्यात आली असून काही अतिक्रमणे काढून टाकण्यात आली आहेत. उर्वरीत अतिक्रमणेही काढून टाकण्यात येतील.विधिमंडळाच्या अधिवेशनात आमदार राजेश राठोड, अशोक उर्फ भाई जगताप, अभिजित वंजारी, डॉ. प्रज्ञा सातव, धीरज लिंगाडे यांनी विधानपरिषदेमध्ये खडकवासला आणि पवना धरण परिसरातील अतिक्रमणांचा मुद्दा तारांकित प्रश्नाद्वारे उपस्थित केला.

### पाणीपुरवठ्यावर त्याचा परिणाम

खडकवासला आणि पवना या धरणांच्या जलाशयांच्या क्षेत्रातील जलसंपदा विभागाच्या सुमामे एक हजार एकर जमिनीवर अतिक्रमण झाले असून दोन्ही धरणांच्या अतिक्रमण केलेल्या जागांवर पाचशेहून अधिक बंगले, लॉन, रिसॉर्ट उभारण्यात आले आहेत. तसेच भराव घालून बेकायदा जमीन हस्तगत करण्यात आली आहे. त्यामुळे धरमातील पाणी साठविण्याची क्षमता कमी झाली असून जिल्ह्यातील पाणीपुरवठ्यावर त्याचा परिणाम होत आहे का, आणि जलाशयांच्या क्षेत्रातील अतिक्रमणे काढण्यासाठी जलसंपदा विभागाने कोणती कारवाई केली आहे, अशी विचारणा विधानपरिषदेत आमदारांनी केली.

# पुण्यात बेकायदा जाहिरात फलक उभारला!

## नदीपात्रातील जागेत पालिकेलाही न जुमानता बेकायदा जाहिरात फलक

। पुणे ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**संभाजी पोलिस चौकीच्या मागे असलेल्या नदीपात्रातील जागेत महापालिकेलाही न जुमानता बेकायदा जाहिरातफलक उभारण्याचे काम पूर्ण झाले आहे. या जाहिरात फलकाला महापालिकेने कोणतीही परवानगी दिलेली नसताना आणि महापालिकेने होर्डिंग उभारताना आक्षेप घेतल्यानंतरही हे होर्डिंग उभे राहिल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे.**



दंड आणि कारवाईच्या माध्यमातून दणका देणारी महापालिका या व्यावसायिकावर मेहेरबान का होत आहे, असा प्रश्न या निमित्त उपस्थित झाला आहे. होर्डिंग उभारणारी व्यक्ती सत्ताधारी राजकीय पक्षाशी संबधित असून,डोक्यावर असल्याने कारवाई करण्यासाठी महापालिका प्रशासन आणि पोलिस टाळाटाळ करीत असल्याची चर्चा महापालिकेत सुरू आहे. नदीपात्रात कोणत्याही प्रकारची होर्डिंग उभारण्यासाठी परवानगी देण्यात येऊ नये, असे आदेश न्यायालयाने दिलेले आहेत. याकडे दुर्लक्ष करत टिळक चौकातील संभाजी पोलिस चौकीच्या मागे असलेल्या जागेत मोठे होर्डिंग उभारण्याचे काम गेल्या तीन दिवसांपासून सुरू आहे. या होर्डिंगची परवानगी कोणी दिली याची विचारणा करण्यासाठी गेलेल्या आकाशचिन्ह विभागाच्या कर्मचाऱ्यांना अपशब्द वापरत या व्यावसायिकाने हाकलून दिले होते.नदीपात्रातील याच जागेवर दीड ते पावणेदोन वर्षापूर्वी एक होर्डिंग उभारण्यात आले होते. महापालिकेच्या कसबा विश्रामबाग क्षेत्रीय कार्यालयाच्या तत्कालीन अधिकाऱ्यांनी चुकीच्या पद्धतीने दिलेल्या परवानगीमुळे हे होर्डिंग उभारण्यात आले होते. त्याबाबतच्या तक्रारी आल्यानंतर प्रसारमाध्यमांनी हा विषय उचलून धरत महापालिका प्रशासनाला विचारणा केली होती. त्यानंतर न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली होती. त्यावर निकाल देताना न्यायालयाने महापालिकेच्या बाजूने निकाल देत हे होर्डिंग काढून टाकण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार महापालिकेने हे होर्डिंग काढून टाकले होते. आता पुन्हा याच ठिकाणी हे होर्डिंग उभारण्यास सुरुवात झाली आहे. गेल्या वर्षी कारवाई करत कापलेल्या लोखंडी फाउंडेशनवरच आता नट-बोल्ट च्या साहाय्याने होर्डिंगचा हा सांगाडा उभारण्यात आला आहे. केवळ नटबोल्टवर हा सांगाडा उभा राहत असल्याने तो धोकादायक असून, काही दुर्घटना घडल्यानंतर महापालिका याची जबाबदारी घेणार का, अशी विचारणा येथील स्थानिक नागरिकांकडून केली जात आहे.

### तक्रार दिली पण प्रत मिळेना

या प्रकरणी संबंधित व्यावसायिकाच्या विरोधात सरकारी कामात अडथळा आणल्याची तक्रार महापालिका कर्मचाऱ्यांनी डेक्कन पोलिस ठाण्यात दाखल केली. या तक्रारीनंतर गुन्हा दाखल झाल्याची प्रत अजूनही पोलिसांकडून महापालिकेला देण्यात आलेली नाही. वाहतूक ना हरकत, मालकाचे संमतिपत्र, वृक्ष संवर्धन विभागाने दिलेले ना हरकत यांची मुदत संपली आहे, असेही नमूद करण्यात आले आहे.

## नागरिकांना कुठलाही त्रास होऊ नये, यासाठी

# पादचारी मार्गावर अतिक्रमण होऊ देऊ नका!

### अतिरिक्त आयुक्तांकडून विभागांना सूचना, पादाचारी मार्गांची केली पाहणी

। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पादचारी नागरिकांना कुठलाही त्रास होऊ नये, यासाठी रस्त्याच्या बाजुला असणारे पादचारी मार्गावर अतिक्रमण होऊ देऊ नका, रस्ता दुभाजकाची स्थिती चांगली ठेवा, रस्ता दुभाजकांमध्ये लावण्यात आलेल्या झाडांची देखभाल करा, अशा सूचनाही अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांनी संबंधित विभागांना दिल्या.**



पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांनी मंगळवारी ‘ड’ आणि ‘ब’ क्षेत्रीय कार्यालयांतर्गत येणा-या विकास आराखड्यातील विकसित केलेल्या रस्त्यावरील करावयाचे वृक्षारोपण आणि दुभाजकामधील वृक्षारोपण याचे देखभाल दुरुस्ती कामांची पाहणी केली.

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्या मार्गदर्शनाखाली पादचारी मार्गांवरून नागरिकांचा प्रवास सुखकर व्हावा, यासाठी सातत्याने उपाययोजना करण्यात येत असतात. तसेच रस्ता दुभाजक आणि पादचारी मार्गावर आवश्यक त्या ठिकाणी झाडांची लागवड करण्यात येत असते. याच अनुषंगाने मंगळवारी अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांनी ‘ड’ क्षेत्रीय कार्यालयांतर्गत येणाऱ्या वाकड येथील उत्कर्ष चौक, पिंक सीटी, कावेरीनगर पोलीस लाईन तसेच ‘ब’ क्षेत्रीय कार्यलयांतर्गत येणाऱ्या गुजरनगर, चिंचवडे चौक, बिर्ला हॉस्पिटल, आकुर्डी येथील रस्ता दुभाजक व पादचारी मार्ग कामाची पाहणी केली. याप्रसंगी उद्यान विभागाचे सहाय्यक आयुक्त उमेश ढाकणे, स्थापत्य विभागाचे सहशहर अभियंता देवन्ना गट्टूवार, उद्यान अधिक्षक राजेंद्र वसावे, उद्यान विभागाचे पर्यवेक्षक यांच्यासह उद्यान व स्थापत्य विभागाचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

पिंपरी चिंचवड शहरातील वाकड, वाल्हेकर वाडी, आकुर्डी, थेरगाव अशा भागातील विविध रस्त्यांची पाहणी करताना जांभळे पाटील यांनी नागरिकांचा प्रवास सुखकर व्हावा, यासाठी उपस्थित अधिकाऱ्यांना विविध सूचना दिल्या. यामध्ये रस्ता दुभाजकांची वेळोवेळी स्वच्छता करणे, रस्ता दुभाजकांमध्ये झाडांची लागवड करणे, रस्ता दुभाजकांमध्ये असलेल्या झाडांना वेळेवर पाणी देणे, पादचारी मार्गावर शक्य तेथे सावली देणाऱ्या झाडांची लागवड करणे, अशा सूचनांचा समावेश होता.

> पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ‘ड’ आणि ‘ब’ क्षेत्रीय कार्यालयांतर्गत झालेल्या नविन रस्त्यांमध्ये करावयाचे वृक्षारोपण आणि रस्ते दुभाजक मधील झाडांची देखभाल या कामांची पाहणी करून आढावा घेण्यात आला आहे. शहरातील रस्त्यांवर वाहतूक कोंडी होऊ नये, पादचारी नागरिकांचा प्रवास अधिक सुखकर व सुरक्षित व्हावा, यासाठी महानगरपालिका विविध उपाययोजना करीत असते. त्या अनुषंगाने आवश्यक त्या सूचनाही संबंधित विभागांना दिल्या आहेत.
> **–प्रदीप जांभळे पाटील,** अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका



## सार्वजनिक आरोग्य सेवांमध्ये महापालिका अव्वल

### पिंपरी-चिंचवडमध्ये आरोग्य व्यवस्थापन, मातृ व बाल संगोपन आणि लसीकरणात आघाडी

### 92 गुणांसह ठरली राज्यातील सर्वोत्कृष्ट महानगरपालिका

। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी- चिंचवड : पिंपरी-चिंचवड शहर कचरामुक्त करण्यासाठी पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाने विविध उपक्रम सुरू केले आहेत. सार्वजनिक ठिकाणी टाकल्या जाणाऱ्या कचऱ्याची समस्या सोडवण्यासाठी असा परिसर स्वच्छ करून तेथे ‘सेल्फी पॉईंट’ केले जात आहेत. अशा जागांवर सेल्फी काढण्यासाठी नागरिकांचीही लगबग वाढू लागली आहे.**



पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने सार्वजनिक आरोग्य व्यवस्थापन आणि माहिती प्रणाली अहवालानुसार राज्यातील पालिकांमध्ये प्रथम क्रमांक मिळवण्याचा मान पटकावला आहे. राज्य कुटुंब कल्याण कार्यालय पुणे यांनी हा अहवाल प्रसिद्ध केला असून या अहवालात १ एप्रिल २०२४ ते ३१ जानेवारी २०२५ पर्यंतच्या आकडेवारीचा समावेश करण्यात आला आहे. सार्वजनिक आरोग्याच्या विविध निकषांवर, विशेषतः कुटुंब कल्याण, मातृ व बाल संगोपन, तसेच नियमित लसीकरण कार्यक्रम यामध्ये पिंपरी- चिंचवड महानगरपालिकेने उल्लेखनीय यश संपादन केले आहे. राज्य कुटुंब कल्याण कार्यालयाने प्रसारित केलेल्या जानेवारी २०२५ च्या अहवालानुसार, पिंपरी- चिंचवड महानगरपालिकेने ९२ गुण मिळवत अव्वल स्थान मिळवले आहे. महानगरपालिकेच्या वैद्यकीय विभागाने आरोग्य सेवा सक्षम करण्यासाठी अनेक प्रभावी उपक्रम राबवले आहेत. यामध्ये मातृ व बाल संगोपन कार्यक्रमांतर्गत गरोदर माता नोंदणी, १२ आठवड्यांपूर्वी प्रसूतीपूर्व नोंदणी, गरोदर मातांचे लसीकरण आणि आयएफए गोळ्यांचे वितरण यासारख्या उपक्रमांचा समावेश आहे. तसेच बाल आरोग्य सेवांच्या अंतर्गत नवजात बालकांची नोंदणी प्रभावीपणे झाली आहे. नियमित लसीकरण, कुटुंब नियोजन कार्यक्रम, कुटुंब नियोजनाच्या शस्त्रक्रियांचे नियोजन, तसेच पीपीआययूसीडी.बसवण्याचे प्रमाण वाढवण्यावर भर, गरोदर महिलांसाठी उच्च दर्जाच्या आरोग्य सेवा पुरवण्यावर भर देणे, या सारख्या विविध उपक्रमांचाही यामध्ये समावेश आहे.

### राज्यातील आघाडीच्या महानगरपालिका

| | |
|---|---|
| पिंपरी-चिंचवड | – ९२ गुण (प्रथम क्रमांक) |
| कोल्हापूर | - ८८ गुण (द्वितीय क्रमांक) |
| सोलापूर | - ८८ गुण (तृतीय क्रमांक ) |
| नवी मुंबई | - ८८ गुण ( चतुर्थ क्रमांक) |
| सांगली | - ८७ गुण (पाचवा क्रमांक) |
| पुणे | - ८७ गुण ( सहावा क्रमांक) |

> पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या सार्वजनिक आरोग्य व्यवस्थापनास राज्यपातळीवर प्रथम क्रमांक मिळाल्याचा आम्हाला अभिमान आहे. नागरिकांचे सहकार्य आणि प्रशासनाच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळेच हे यश मिळाले आहे. भविष्यात अधिक व्यापक आणि दर्जेदार आरोग्यसेवा देण्यासाठी आम्ही सातत्याने विविध उपक्रम राबवण्यावर, उपाययोजना करण्यावर भर देत आहोत.
> **–शेखर सिंह,** आयुक्त तथा प्रशासक

## उदात्तीकरण काय करतो?

# ‘त्या’ औरंग्याने माझ्या राजासमोर भिक मागितली!

### भाजपाचे प्रखर हिंदूत्ववादी नेते महेश लांडगे यांचा अबू आझमीवर सभागृहात संताप

### धार्मिक तेढ निर्माण करणाऱ्या आमदार अबू आझमी प्रवृत्तीला ठेचून काढा!

। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । विशेष प्रतिनिधी।

**हिंदूस्थानवर क्रुरपणे अमानुष अत्याचार करणारा मुघल सम्राट औरंगजेबने माझ्या धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या समोर इस्लाम स्वीकारण्यासाठी भिक मागितली होती. त्या औरंग्याचे उदात्तीकरण काय करतो? महाराष्ट्रात धार्मिक तेढ निर्माण करणाऱ्या आमदार अबु आझमी सारख्या प्रवृत्तींना सभागृहातच आणि रस्त्यावर ठेचून काढले पाहिजे, असा संताप भाजपाचे प्रखर हिंदूत्ववादी नेते तथा आमदार महेश लांडगे यांनी भर सभागृहात व्यक्त केला.**






महाराष्ट्रातील समाजवादी पक्षाचे क्रूरकर्मा औरंगजेब धार्जिने आमदार अबू आझमी यांनी अकलेचे तारे तोडलेले आहेत. याच्या निषेधार्थ विधानभवनाच्या पायऱ्यांवर भारतीय जनता पार्टी महायुतीच्या समविचार आमदारांनी आज आंदोलन केले. या आंदोलनामध्ये “हाल हाल करुन मारला आमचा छावा... औरंग्याच्या औलादीला माफी मागायला लावा..” अशी मागणी करीत आमदार महेश लांडगे सहभागी झाले.


आमदार लांडगे म्हणाले की, धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांनी या धर्मासाठी मरावे कसे याचा आदर्श अजरामर केला बलिदान दिले त्याग समर्पण केले. ” छावा” चित्रपटाच्या माध्यमातून माझ्या राजाचा जाज्वल्य इतिहास नव्या पिढीपर्यंत पोहोचला. ज्या माझ्या राजाला औरंग्याने हाल हाल करून मारले त्या औरंग्याचे उदातीकरण करताना अबू आझमी सारख्या धर्मांध लोकप्रतिनिधीला लाज कशी वाटत नाही? असा प्रश्न लांडगे यांनी उपस्थित केला.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकार हिंदुत्वाचा पुरस्कार करते. आमचे पंतप्रधान कुंभमेळ्यातील पवित्र स्नान करतात आणि दुसऱ्या बाजूला जगातील आर्थिक महासत्ता बनण्याचा संकल्प ही भारतवासियांच्या मनामध्ये रुजवतात. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस गोहत्या, लव्ह जिहाद, धर्मांतर, व्होट जिहाद सारख्या प्रवृत्तींचा एका बाजूला रिमोट करतात आणि दुसऱ्या बाजूला “3 ट्रिलियन इकॉनॉमी” असे महाराष्ट्रासाठी व्हिजनही ठेवतात. आमचे नेते हिंदुत्ववादी सरकार म्हणून लोकांमध्ये विकासाचे मुद्दे घेऊन जातात. पण, तुमचा जन्म केवळ जातीय धार्मिक तेढ निर्माण करण्यासाठी झालेला आहे, अशी जहरी टीका आमदार लांडगे यांनी केली आहे.

### आझमीवर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करावा..

अबू आझमी सारख्या धर्मांध लोकांमुळे महाराष्ट्रामध्ये जातीय तेढ निर्माण होत आहे. स्वतःच्या भावांची क्रूरपणे हत्या करून राजा बनलेला तुझा औरंग्या आणि स्वतःच्या भावाच्या पादुका ठेवून रामराज्य करणारा भरत राजा यात फरक आहे. धर्मरक्षणासाठी शेवटच्या श्वासापर्यंत न झुकलेला माझा राजा कुठे? आणि माझा इस्लाम स्वीकारा म्हणून माझ्या राजासमोर भीक मागणारा तुझा औरंग्या कुठे? देशात औरंग्याच्या ज्या काही लाचार अवलादी आहेत. त्याच्यामध्ये एकाने तरी विकासाच्या मुद्द्यावरती भाष्य केल्याचं दिसते का? प्रखर हिंदुत्वाचा विचार व विकासाचा संकल्प आणि स्वप्न घेऊन काम करणारे माझे हिंदुत्ववादी महायुती सरकार या औरंग्याचे उदात्तीकरण करणाऱ्या प्रवृत्तींना धडा शिकवल्याशिवाय राहणार नाही. महाराष्ट्रमध्ये धार्मिक तेढ निर्माण करणाऱ्या अबू आझमीवर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करावा आणि कठोर कारवाई करावी, अशी मागणी मी या निमित्ताने सभागृहासमोर करणार आहे, असा घणाघातही आमदार महेश लांडगे यांनी केला.

## श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांची प्रवचने



### प्रपंचाचे स्वरूप समजून घेऊन नामात राहावे.

आपले जीवन किती अस्थिर आहे हे लढाईच्या काळात चांगले समजून येते. अशा अस्वस्थतेच्या काळात मनाने घाबरू नये. काळजी न करता शांत चित्ताने भगवन्नामांत कर्तव्य करीत राहावे. काळजीला म्हणा कारण असे काहीच लागत नाही, कारण ती आपल्या काळजापर्यंत, नव्हे काळजापाशीच असते. काळजी करायचीच म्हटले म्हणजे कोणत्याच गोष्टी तिच्यातून सुटत नाहीत. काळजीमुळे मानसिक आणि शारीरिक त्रास होतो. ज्याला काळजी नाही त्याने भगवंत आपलासा करून घेतला हे समजावे. भगवंतावर पूर्ण विश्वास टाकून, तुम्ही काळजी करण्याचे एकदम बंद करा. ज्याप्रमाणे कुणाचीही कुंडली मांडली, मग तो श्रीमंत असो की गरीब असो, तरी तिच्यामध्ये सर्व ग्रह यायचेच, त्याचप्रमाणे जन्मलेल्या प्रत्येक प्राण्याला सर्व विकार असायचेच. भगवंताचे अवतार जरी झाले किंवा साधु-पुरुष जरी झाले तरी त्यांनाही विकार असतातच. अर्थात् त्या विकारांच्या बरोबर प्रेम, दया, शांती, क्षमा हे गुणही त्यांच्या अंगी असतात. ग्रह हे या जन्माचे आहेत, पण विकार हे मागच्या जन्मापासून असलेले असतात. या विकारांना वश न होता, म्हणजेच त्यांचे नियमन करून, गुणांचे संवर्धन करणे हे प्रपंचात मनुष्याला शिकायचे असते. कुटुंबातल्या व्यवहारामध्ये प्रत्येक घटकाने आपापले स्थान ओळखून असावे. ज्याला स्वत:च्या मुलाबद्दल प्रेमामुळे इतकी खात्री असते की, आपण सांगितलेले आपला मुलगा केल्याशिवाय राहणार नाही, तो बाप खरा. ज्याला अशी उत्सुकता असते की, वडिलांनी आपल्याला सांगावे आणि आपण ते करावे, तो मुलगा खरा. बापाचा पैसा हा मुलाने अनीतीने वागण्यासाठी नाही. जो मुलगा अनीतीने वागतो, त्याला बापाने पैसा देऊ नये. ज्याप्रमाणे वर बसणाऱ्याची मांड पाहून घोडा दांडगाई करतो, त्याचप्रमाणे बापाचे पाणी ओळखूनच मुलगा वागतो. गृहिणीने स्वत: स्वयंपाक करून घरातल्या माणसांना जेवायला घालावे; त्या करण्यामध्ये प्रेम असते. प्रत्येक गृहिणीला घरामध्ये थोडे तरी काम पाहिजेच. खरोखर, विवाहामध्ये बंधने फार आहेत; कारण ती अत्यंत पवित्र गोष्ट आहे. जो मनुष्य तरुणपणी स्वाभाविक रीतीने आणि नीतिनियमानुसार वागेल त्याला म्हातारपण मुळीच दु:खदायक होणार नाही. आज ज्याने चांगले वागण्याचा निश्चय केला त्याचे मागले पुसलेच. भगवंत रोज संधी देतो आहे; आज सुधारले आणि कालचे पुन: केले नाही म्हणजे पूर्वीचे नाहीसे होते, हीच संधी.

**बोधवचन:- जो शहाणा असेल त्याने समजून, व जो अडाणी असेल त्याने श्रद्धेने बंधने पाळावी.**

# कालचे एकदिलाचे निर्णय, आजचे 'घोटाळे' कसे ?



**'स्टेट'मेंट**

अधिकराव दिवे-पाटील
संस्थापक, संपादक

**यापूर्वी, महाराष्ट्रात 'महायुती'चे सरकार सत्तेवर होते आणि आताही आहे..फरक एवढाच आहे, की पूर्वी एकनाथ शिंदे मुख्यमंत्री होते आणि आता देवेंद्र फडणवीस आहेत ! खुर्च्यांची नुसती अदलाबदल झाली नाही, तर धोरणे बदलून गेली आहेत.. दृष्टिकोन बदलला आहे.. कालचे एकदिलाचे निर्णय, आजचे 'घोटाळे' कसे काय झाले ? हेच सर्वसामान्य नागरिकाला समजेनासे झाले आहे !**



### बाटली जुनी दारू तीच !

फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली 'महायुती'चे 'नवी विटी, नवे राज्य' सुरू झाल्यापासून त्यांच्या कारभाराचे दणके शिवसेनेच्याच वाट्याला जास्त आले. फार कमी दणके राष्ट्रवादीला बसले.

सध्याचा ऐरणी वरील प्रश्न म्हणजे पी ए आणि ओ एस डी यांच्या नियुक्तीचा! तो अधिकार मुख्यमंत्र्यांना आहे, हे सर्वांनी मान्य केले असले तरी पूर्वीच्या सरकारमध्ये हा हक्क एकनाथ शिंदे यांनी बजावला होता का ? त्यांनी तर मोकळीक दिली होती असे अधिकारीही सांगतात. हाच नव्हे तर अनेक प्रश्न सध्या वादामुळे चर्चेत आहेत.

### वेगवेगळी कंत्राटे अचानक टार्गेटवर..

मुंबईच्या झोपडपट्ट्यांतील सफाई, शौचालयांची देखभाल आणि घनकचरा व्यवस्थापनाचे एक हजार चारशे कोटी रुपयांचे कंत्राट एकाच खासगी संस्थेला दिले जाणार होते. पण, मुंबईचा कचरा साफ करण्यासाठी पुण्याचा झाडू ठाणेमार्गे कशासाठी? हा प्रश्न आता हलक्यात घेतला गेला नाही. त्यांनी हे कंत्राटच रद्द करून टाकले. याच पद्धतीने त्यांनी एसटी बसेस खरेदीला ब्रेक लावला, निर्णयाची चौकशी लावली. अडीच वर्षांच्या राजवटीत असे अनेक 'हलक्यात' घेतले गेलेले निर्णय फडणवीसांनी चौकशीच्या कक्षेत आणणे आता सुरू केलेले दिसते. एकनाथ शिंदे यांनी सांगितले होते, की मला हलक्यात घेऊ नका.. पण, प्रत्यक्षात त्यांना अत्यंत हलक्यात घेतले गेले की काय?

### बळीराजाचा प्रश्न ऐरणीवर..

बळीराजाचे धान्य खरेदी करण्यासाठी नेमण्यात येणाऱ्या राज्य पातळीवरील खरेदी कंपन्यांचे अचानक उदंड पीक महाराष्ट्रात आले. ते देखील फडणवीस यांनी आता कापून काढले. राज्य कारभार कसा हलक्यात घेतला जातो, याचे उत्तम उदाहरण म्हणून या शेतमाल खरेदीतील नोडल एजन्सी घोटाळ्याकडे बघावे लागते, अशी वस्तुस्थिती आली आहे.

### शेतीमालाला फटका, बळीराजाची लूटमार

एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्री म्हणून सत्तासूत्रे हाती घेताच राज्य शासनाने आधीच नियुक्त केलेल्या केवळ आठ एजन्सीज हमीभावाने धान्य आणि तेलबिया खरेदी करतील, असे फर्मान जारी करण्यात आले होते. याचा अर्थ या एजन्सीजची संख्या सरकारने आठवर का गोठवली ? कारण म्हणे, अनेक कंपन्यांना अनुभव नसताना शेतमाल खरेदीत उतरायचे आहे आणि त्यासाठी या कंपन्या राजकीय दबाव 'महायुती' सरकारवर आणत आहेत. हा दबाव झुगारून तत्कालीन शिंदे सरकारने कंपन्यांची संख्या आठवर गोठवली होती. पण, शेवटी सेटर्स म्हणा की दलाल, सरकारीपदांवर बसले की, ते सरकारचे निर्णयच काय, सरकार देखील आपल्या हिशेबाने फिरवतात. शिंदे राजवटीतच शेतमाल खरेदी करणाऱ्या या नोडल एजन्सीजची संख्या आठचा अंक भेदून तब्बल 46 वर पोहोचली. देशभरातला हा उच्चांक गाठला तो शेतकऱ्यांना लुटण्यासाठी ! हेच यातून स्पष्ट होते.

### केंद्रस्थानी अब्दुल सत्तार..

उत्तर प्रदेशसारख्या सर्वांत मोठ्या राज्यात शेतमाल खरेदी करणाऱ्या नोडल एजन्सीज जेमतेम दोन-चार आहेत. महाराष्ट्रात त्यांचे उदंड पीक आणले ते सेटर्स आणि दलाल असूनही कुणा मंत्र्यांचा पीएस किंवा ओएसडी झालेल्या मंडळींनी! आता, या एजन्सीज किती असाव्यात, हे ठरविण्यासाठी मंत्री समिती स्थापन करताना मूळ आठच एजन्सीज हमीभावाने शेतमाल खरेदी करतील, असे फर्मान फडणवीसांनी काढले. ज्यांनी हा कारभार केला, ते शिंदे गटाचे मंत्री होते अब्दुल सत्तार!अशा भानगडींमुळेच ते आज मंत्रिमंडळात नाहीत. त्यांनी करून ठेवलेली घाण निस्तरणे भाग आहे, म्हणून फडणवीस यांनी घेतलेला हा निर्णय मात्र 'महायुती' त बेदिली असल्याची चर्चा घडवतो आहे; पण, अशी कोणतीही बेदिली नाही. हा फेव्हिकॉलचा जोड आहे, तो तुटणार नाही, असे उत्तर देत एकनाथ शिंदे यांनी ही चर्चा फेटाळली आहे, हे जास्त धक्कादायक वाटते !

### नीलम गोऱ्हे यांची मर्सिडीज..

'मर्सिडीज' देऊन उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेची पदे पटकावणाऱ्या डॉ. नीलम गोऱ्हे महाराष्ट्रात धुरळा उडवून गेल्या. किती मर्सिडीज दिल्या, हे त्यांनी सांगितले नाही. मात्र, हा धुरळा उडवला, तर परिषदेची आमदारकी आणि उपसभापतिपद कायम राखता येईल, असा विचार नीलमताईंनी केला असू शकतो. पण, त्यासाठी त्यांनी साहित्य संमेलनाची जागा निवडणे कोणीच हलक्यात घेतले नाही.

### नीलमताईंनी आधी घेतले, मग सांगितले!

शिवसैनिकाला फुटका कप चहादेखील न देता पाच वेळा आमदारकी, थेट उपनेतेपद पटकावणाऱ्या नीलमताई उद्धव ठाकरे गटाबद्दल असे बोलू शकतात? त्यांचे हे बोलणे खुद्द एकनाथ शिंदे यांनी हलक्यात घेऊ नये. मोठा उठाव करून शिंदे यांची रिक्षा उद्धव ठाकरेंची मर्सिडीज मागे टाकून पुढे गेली आहे हे शिंदेंनी लक्षात ठेवावे. देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनी कालपर्यंत एकदिलाने घेतलेले निर्णय आज 'घोटाळे' ठरतात आणि निष्ठेचे निशाण घेऊन पदांवर बसलेल्या माणसांचा भरवसा देता येत नाही. दुर्दैवाने, महाराष्ट्राचे राजकारण असेच सुरू आहे, त्याला तुम्ही आणखी काय करणार ?

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# धनंजय मुंडेंचा अखेर राजीनामा!

## मुख्यमंत्री फडणवीस प्रारंभीपासून मुंडे यांच्या राजीनाम्यासाठी होते आग्रही

| मुंबई | प्रतिनिधी | महाईन्यूज |

**सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येचं प्रकरण गेल्या ३ महिन्यांपासून राज्यभरात तापलेलं आहे. या प्रकरणात राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते धनंजय मुंडे यांचा निकटवर्तीय वाल्मिक कराडला अटक झाली. त्याच्यावर मकोका लावण्यात आला. या प्रकरणाच्या तपासावर परिणाम होऊ नये म्हणून मुंडे यांच्या राजीनाम्याची मागणी गेल्या २ दिवसांपासून सुरु होती. अखेर आज त्यांनी राजीनामा दिला. देशमुख यांच्या निर्घृण हत्येचे काही फोटो काल रात्री समोर आले. ते पाहून संपूर्ण महाराष्ट्र हादरला. अखेर आज सकाळी मुंडेंनी राजीनामा दिला. या राजीनाम्याचा घटनाक्रम आता समोर आला आहे.**



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे प्रारंभीपासून धनंजय मुंडे यांनी राजीनामा द्यावा, यासाठी आग्रही होते. यापूर्वी त्यांनी ३ ते ४ वेळा अजित पवारांशी चर्चा केली होती. स्वत: धनंजय मुंडे यांनाही समजावून सांगितलं होतं. पण, धनंजय मुंडे ऐकायला तयार नव्हते. शेवटी एका क्षणी देवेंद्र फडणवीस यांनी अशी भूमिका घेतली की, जर तुम्ही राजीनामा देणार नसाल, तर मला राज्यपालांना पत्र लिहून तुम्हाला मंत्रिमंडळातून काढण्याची कारवाई करावी लागेल. थेट मुख्यमंत्र्यांनीच इशारा दिल्यानंतर वातावरण बदललं. काल रात्री देवगिरी बंगल्यावर राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्यांची बैठक झाली. त्या बैठकीला मुख्यमंत्री फडणवीसही गेले होते. उद्याच राजीनामा द्या, असा आदेशच या बैठकीत मुख्यमंत्र्यांनी मुंडेंना दिला. त्यानंतर आज सकाळी मुंडेंचा राजीनामा मुख्यमंत्र्यांच्या हाती आला. प्रारंभीपासूनच या प्रकरणात मुख्यमंत्र्यांनी अतिशय कडक आणि ठोस भूमिका घेतली होती, अशी सूत्रांची माहिती आहे. धनंजय मुंडेंच्या राजीनाम्यावर अजित पवारांनी भूमिका स्पष्ट करावी, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस माध्यमांशी संवाद साधताना म्हणाले होते. बीडच्या केज तालुक्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांची ९ डिसेंबरला निर्घृण हत्या झाली. अपहरण करुन त्यांचे हाल हाल करण्यात आले. लोखंडी पाईप, क्लच वायरनं त्यांना बेदम मारलं गेलं. सुदर्शन घुले आणि त्याच्या साथीदारांनी देशमुख यांचा निर्दयीपणे जीव घेतला. या टोळीनं केलेली मारहाण इतकी भीषण होती की देशमुख यांचं दीड लीटर रक्त साकळलं. आवादा कंपनीच्या पवनचक्की प्रकल्पासाठी कराड आणि त्याच्या टोळीनं खंडणी मागितली होती. पण कंपनीच्या कर्मचाऱ्यांनी त्यास विरोध केला. त्यातून देशमुख यांच्या हत्येचा प्रकार घडला. या संपूर्ण प्रकरणात कराड क्रमांक एकचा आरोप आहे. तो मुंडे यांच्या अत्यंत जवळचा आहे. त्यामुळे मुंडेंनी नैतिकता म्हणून राजीनामा देण्याची मागणी केली जात होती.मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येचे फोटो व्हायरल झाल्यानंतर मोठी खळबळ निर्माण झाली. देवेंद्र फडणवीस यांनी लगेचच देवगिरी बंगला गाठला आणि अजित पवार, सुनील तटकरे यांच्यासोबत बैठक घेतली. यावेळी धनंजय मुंडे देखील उपस्थित होते. शेवटी आता धनंजय मुंडे यांनी आपला राजीनामा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे दिला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे प्रारंभीपासून धनंजय मुंडे यांनी राजीनामा द्यावा, यासाठी आग्रही होते. यापूर्वी त्यांनी ३ ते ४ वेळा अजित पवारांशी चर्चा केली होती. स्वत: धनंजय मुंडे यांनाही समजावून सांगितलं होतं. पण, धनंजय मुंडे ऐकायला तयार नव्हते. शेवटी एका क्षणी देवेंद्र फडणवीस यांनी अशी भूमिका घेतली की, जर तुम्ही राजीनामा देणार नसाल, तर मला राज्यपालांना पत्र लिहून तुम्हाला मंत्रिमंडळातून काढण्याची कारवाई करावी लागेल.

### पवारांनी भूमिका स्पष्ट करावी

थेट मुख्यमंत्र्यांनीच इशारा दिल्यानंतर वातावरण बदललं. काल रात्री देवगिरी बंगल्यावर राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्यांची बैठक झाली. त्या बैठकीला मुख्यमंत्री फडणवीसही गेले होते. उद्याच राजीनामा द्या, असा आदेशच या बैठकीत मुख्यमंत्र्यांनी मुंडेंना दिला. त्यानंतर आज सकाळी मुंडेंचा राजीनामा मुख्यमंत्र्यांच्या हाती आला. प्रारंभीपासूनच या प्रकरणात मुख्यमंत्र्यांनी अतिशय कडक आणि ठोस भूमिका घेतली होती, अशी सूत्रांची माहिती आहे. धनंजय मुंडेंच्या राजीनाम्यावर अजित पवारांनी भूमिका स्पष्ट करावी, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस माध्यमांशी संवाद साधताना म्हणाले होते.

# लाडक्या बहिणींना सरकारचं डबल गिफ्ट!

## महिला दिनाच्या पूर्वसंध्येला जमा होणार सन्माननिधी

| मुंबई | प्रतिनिधी | महाईन्यूज |

**महाराष्ट्रात महायुतीचं सरकार पुन्हा येण्याच्या आधीपासून चर्चेत आलेली योजना म्हणजे लाडकी बहीण योजना. या योजनेच्या पुढील हप्त्याबाबत एक महत्त्वाची माहिती समोर आली आहे. महिला दिन म्हणजेच ८ मार्चच्या आधी ७ मार्चच्या संध्याकाळपर्यंत पात्र महिलांच्या खात्यात सन्मान निधीची रक्कम जमा होणार आहे. आदिती तटकरेंनी याबाबत पोस्ट करुन माहिती दिली आहे.**



हे अडीच लाखांपेक्षा कमी आहे, अशा कुटुंबातील महिलांसाठी सरकारनं लाडकी बहीण योजना सुरू केली आहे. या योजनेंतर्गत लाभार्थी महिलांच्या बँक खात्यामध्ये दर महिन्याला दीड हजार रुपये जमा करण्यात येतात. गेल्या जुलै महिन्यापासून ही योजना सुरू झाली आहे. आतापर्यंत महिलांच्या बँक खात्यामध्ये या योजनेचे एकूण सात हफ्ते जमा झाले आहेत. मात्र फेब्रुवारी उलटून गेला तरी देखील अद्याप आठवा हाफ्ता लाभार्थी महिलांना मिळालेला नाही. तसंच जर आमचं सरकार आलं तर आम्ही लाडकी बहीण योजनेच्या निधीमध्ये वाढ करून महिलांना दर महिन्याला २१०० रुपये देऊ अशी घोषणा सत्तेत येण्यापूर्वी महायुतीच्या नेत्यांकडून करण्यात आली होती. त्यामुळे आता फेब्रुवारीचा हाफ्ता बँक खात्यात कधी जमा होणार? आणि २१०० रुपये कधीपासून मिळणार याकडे लाडक्या बहिणींचं लक्ष लागलं आहे.लाभार्थी महिलांना दिलासा देणारी बातमी आहे, ती म्हणजे येत्या ७ मार्चपर्यंत लाडक्या बहिणींच्या खात्यामध्ये फेब्रुवारी महिन्याचे दीड हजार आणि मार्च महिन्याचे दीड हजार असे एकूण तीन हजार रुपये जमा होणार आहेत. सरकारकडून या महिन्यात लाभार्थी महिलांना डबल गिफ्ट मिळणार आहे. याबाबत मंत्री आदिती तटकरे यांनी एक्स पोस्ट करत माहिती दिली आहे. 'लाडक्या बहिणींना महिला दिनाची भेट ! महिला दिनाच्या पूर्वसंध्येला मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतील सर्व पात्र लाभार्थ्यांना फेब्रुवारी व मार्च महिन्याचा लाभ दिला जाणार आहे. ७ मार्च २०२५ पर्यंत सर्व पात्र लाभार्थ्यांच्या बँक खात्यात दोन महिन्यांचा सन्मान निधी ३००० रुपये जमा करण्यात येईल' अशी पोस्ट आदिती तटकरे यांनी केली आहे.महाराष्ट्राचं अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरु झालं आहे. या अर्थसंकल्पात जर लाडकी बहीण योजनेसाठी वेगळी आणि विशेष तरतूद करण्यात आली तर लवकरच पात्र महिलांना प्रति महिना २१०० रुपयांचा निधी मिळू शकेल अशी चर्चा आहे.

### एकूण सात हफ्ते जमा झाले आहेत

अशा कुटुंबातील महिलांसाठी सरकारनं लाडकी बहीण योजना सुरू केली आहे. या योजनेंतर्गत लाभार्थी महिलांच्या बँक खात्यामध्ये दर महिन्याला दीड हजार रुपये जमा करण्यात येतात. गेल्या जुलै महिन्यापासून ही योजना सुरू झाली आहे. आतापर्यंत महिलांच्या बँक खात्यामध्ये या योजनेचे एकूण सात हफ्ते जमा झाले आहेत.

# एखाद्याला मियाँ, म्हणणे हा अवमान नाही

## सर्वोच्च न्यायालयाने खटला निकाली काढताना केलं स्पष्ट

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था । महाईन्यूज ।**

**एखाद्या व्यक्तीला मियाँ-तियाँ किंवा पाकिस्तानी म्हणून चिडवणे हे वाईट असू शकते, पण हा गुन्हा होऊ शकत नाही. तसेच भारतीय दंड विधान कायद्याच्या कलम २९८ नुसार यातून धार्मिक भावना दुखावल्याचा ठपका ठेवता येणार नाही, असा निकाल सर्वोच्च न्यायालयाने एका प्रकरणाच्या सुनावणी दरम्यान दिला आहे. सरकारी कर्मचाऱ्याला पाकिस्तानी म्हटल्यामुळे गुन्हा दाखल झालेल्या आरोपीला सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश बीव्ही नागरत्ना आणि न्यायाधीश सतीश चंद्र शर्मा यांच्या खंडपीठाने दिलासा दिला आहे.**



फिर्यादीला निर्दोष सोडण्यात यावे, असे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने ११ फेब्रुवारी रोजीच्या निकालात दिले. निकालाची प्रत आज जाहीर करण्यात आली.अतिरिक्त जिल्हाधिकारी यांच्याकडून माहिती अधिकार कायद्यांतर्गत माहिती मागणाऱ्या हरिनंदन सिंह यांच्याविरुद्ध सदर खटला दाखल करण्यात आला होता. तक्रारदार हे उर्दू भाषांतरकार आणि विद्यमान माहिती अधिकारी कारकून आहेत. माहिती मागण्यावरून वाद उद्भवल्यानंतर सिंह यांनी भाषांतर करणाऱ्या कारकुनाला मियाँ-तियाँ आणि पाकिस्तानी म्हटले होते.११ फेब्रुवारी रोजी पार पडलेल्या सुनावणीत सर्वोच्च न्यायालयाने म्हटले, अपीलकर्त्यावर माहिती अधिकार कारकुनाला मियाँ-तियाँ आणि पाकिस्तानी असे म्हटल्याचा आणि त्यातून धार्मिक भावना दुखावल्याचा आरोप आहे. निश्चितच ही विधाने वाईट आहेत. मात्र, यातून धार्मिक भावना दुखावल्या जाव्यात, असे काही नाही. म्हणूनच आम्ही अपीलकर्त्याची निर्दोष मुक्तता करत आहोत. भादंवि कलम २९८ अंतर्गत धार्मिक भावना दुखावण्याच्या हेतून जाणूनबुजून शब्द किंवा हावभाव करण्याच्या कृतीचा समावेश आहे.हरिनंदन सिंह यांनी बोकारो येथील अतिरिक्त जिल्हाधिकारी अधिकाऱ्याकडून माहिती अधिकार कायद्यांतर्गत माहिती मागितली होती. सदर माहिती त्यांना पाठविली गेली असली तरी पोस्टाने पाठवलेल्या कागदपत्रांमध्ये फेरफार करून आणि त्यात छेडछाड झाल्याचा संशय त्यांनी व्यक्त केला.

त्यानंतर अपीलीय अधिकाऱ्याने उर्दू भाषांतरकाराला निर्देश देऊन सिंह यांना वैयक्तिकरित्या माहिती देण्यास सांगितले. १८ नोव्हेंबर २०२० रोजी चास येथील उपविभागीय कार्यालयातील एका सहकाऱ्याला घेऊन भाषांतरकार सिंह यांच्या घरी माहिती घेऊन गेला. मात्र सिंह यांनी कागदपत्रे स्वीकारण्यास नकार दिला. त्यानंतर भाषांतरकाराच्या विनंतीनंतर त्यांनी कागदपत्रे स्वीकारली. यावेळी झालेल्या बाचाबाचीमध्ये सिंह यांनी भाषांतरकाराला उपरोक्त शब्द वापरले तसेच बळाचा वापर केला, असा आरोप करण्यात आला आणि त्याबद्दल एफआयआर दाखल करण्यात आला. सत्र न्यायालयात प्रकरण गेले असता सदर आरोप निश्चित करण्यात आले होते. तसेच झारखंड उच्च न्यायालयानेही सदर कारवाई रद्द करण्याची मागणी फेटाळली होती. त्यानंतर हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात गेले.सर्वोच्च न्यायालयाने ११ फेब्रुवारी रोजीच्या निकालात दिले. निकालाची प्रत आज जाहीर करण्यात आली.अतिरिक्त जिल्हाधिकारी यांच्याकडून माहिती अधिकार कायद्यांतर्गत माहिती मागणाऱ्या हरिनंदन सिंह यांच्याविरुद्ध सदर खटला दाखल करण्यात आला होता. तक्रारदार हे उर्दू भाषांतरकार आणि विद्यमान माहिती अधिकारी कारकून आहेत. माहिती मागण्यावरून वाद उद्भवल्यानंतर सिंह यांनी भाषांतर करणाऱ्या कारकुनाला मियाँ-तियाँ आणि पाकिस्तानी म्हटले होते.११ फेब्रुवारी रोजी पार पडलेल्या सुनावणीत सर्वोच्च न्यायालयाने म्हटले, अपीलकर्त्यावर माहिती अधिकार कारकुनाला मियाँ-तियाँ आणि पाकिस्तानी असे म्हटल्याचा आणि त्यातून धार्मिक भावना दुखावल्याचा आरोप आहे. निश्चितच ही विधाने वाईट आहेत. मात्र, यातून धार्मिक भावना दुखावल्या जाव्यात, असे काही नाही. म्हणूनच आम्ही अपीलकर्त्याची निर्दोष मुक्तता करत आहोत. भादंवि कलम २९८ अंतर्गत धार्मिक भावना दुखावण्याच्या हेतून जाणूनबुजून शब्द किंवा हावभाव करण्याच्या कृतीचा समावेश आहे.हरिनंदन सिंह यांनी बोकारो येथील अतिरिक्त जिल्हाधिकारी अधिकाऱ्याकडून माहिती अधिकार कायद्यांतर्गत माहिती मागितली होती.

### कागदपत्रे स्वीकारण्यास नकार

अपीलीय अधिकाऱ्याने उर्दू भाषांतरकाराला निर्देश देऊन सिंह यांना वैयक्तिकरित्या माहिती देण्यास सांगितले. १८ नोव्हेंबर २०२० रोजी चास येथील उपविभागीय कार्यालयातील एका सहकाऱ्याला घेऊन भाषांतरकार सिंह यांच्या घरी माहिती घेऊन गेला. मात्र सिंह यांनी कागदपत्रे स्वीकारण्यास नकार दिला.

---

# राम मंदिरावर दहशतवादी हल्ल्याचा कट!

## पाकिस्तानी संघटनेच्या संपर्कात असलेल्या संशयिताला अटक

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था । महाईन्यूज ।**

**अयोध्येतील राम मंदिराला लक्ष्य करण्याचा एक मोठा दहशतवादी कट रचणाऱ्या संशयित आरोपीला अटक करत हा कट उधळून लावण्यात गुजरातमधील दहशतवादी विरोधी पथक (एटीएस) आणि फरीदाबाद स्पेशल टास्क फोर्स (एसटीएफ) यांना यश आले आहे. संयुक्त कारवाईत उत्तर प्रदेशातील रहिवासी अब्दुल रहमान (१९) या संशयिताला अटक करण्यात आली**





असून त्याच्या माहितीनंतर फरीदाबाद येथून दोन हँड ग्रेनेड जप्त करण्यात आले आहेत. फरीदाबादमधील सुरक्षा यंत्रणांनी सदर बॉम्ब निकामी केले.सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, अब्दुल रहमान हा पाकिस्तानच्या इंटर सर्व्हिसेस इंटेलिजन्स (ISI) च्या संपर्कात असावा आणि त्याचे अनेक कट्टरपंथी संघटनांशी संबंध असावेत.

असा संशय व्यक्त केला जात आहे. संशयित आरोपी, फैजाबादमध्ये मटणाचे दुकान चालवत होता आणि रिक्षा चालविण्याचे कामही करायचा. मंदिराला लक्ष्य करण्यासाठी त्याने अनेकदा राम मंदिराची रेकी केली होती, तसेच आयएसआयला महत्त्वाची माहिती पुरविली, असा आरोप केला जात आहे.

तो फरीदाबाद ते फैजाबाद असा रेल्वेने प्रवास करणार असल्याचे समजल्यानंतर सुरक्षा यंत्रणांनी त्याला ताब्यात घेतले.एपीबी न्यूजने दिलेल्या बातमीनुसार, फरीदाबाद येथे हँडलरकडून बॉम्ब घेतल्यानंतर रेहमान पुन्हा अयोध्येत येणार होता. मात्र त्यापूर्वीच त्याला अटक करण्यात आली. केंद्रीय यंत्रणेच्या माहितीनंतर गुजरात एटीएस आणि फरीदाबाद एसटीएफ यांनी ही संयुक्त कारवाई केली. चौकशीदरम्यान रेहमानने फरीदाबाद येथे शस्त्रास्त्र लपवून ठेवण्यात आल्याचे सांगितले. या माहितीनंतर पोलिसांनी पाली परिसरातील पडक्या घराची झडती घेतली.

### चौकशीसाठी गुजरातला नेण्यात आले

अब्दुल रेहमानला अटक केल्यानंतर त्याला पुढील चौकशीसाठी गुजरातला नेण्यात आले आहे. तसेच त्याच्याकडून चिथावणीखोर साहित्य जप्त करण्यात आले आहे. अब्दुल रेहमानच्या अटकेमुळे आएसआयच्या पाठिंब्यावर उभी राहिलेली एक मोठी दहशतवादाची साखळी हाती लागू शकते.

# ‘प्रेमाची गोष्ट’मालिकेत मुक्ताचा नवीन लूक!

‘स्टार प्रवाह’वरील ‘प्रेमाची गोष्ट’ मालिकेत सतत नवनवीन ट्विस्ट येत असतात. आता मालिकेतील मुख्य नायिका व कोळी कुटुंबाची सून मुक्ता एका नव्या रुपात प्रेक्षकांसमोर येणार आहे. तिने हा नवीन लूक करण्यामागे एक खास कारण आहे. आपल्या मुलांच्या प्रेमाखातर एक आई काय काय करु शकते याचं उत्तम उदाहरण म्हणजे मुक्ताई. मुक्ताचं हे नवं रुप सावनीला सळो की पळो करून सोडणार आहे. आता मुक्ता नेमकी कोणत्या रुपात झळकणार आहे याबद्दल जाणून घेऊयात... मुक्ता नवीन लूक करण्यामागचं मुख्य कारण आहे तिची लाडकी सईमाऊ. सईवर मुक्ताचं जीवापाड प्रेम आहे. सईशिवाय ती एक क्षणही राहू शकत नाही. मात्र,



चिमुकली सई सध्या तिच्या मुक्ताईवर रुसली आहे. मुक्ताईचं पूर्वीसारखं आपल्यावर प्रेमच नाही असा गैरसमज तिने करुन घेतला आहे. म्हणूनच तर रागावलेली सई सध्या मुक्तापासून दूर सावनीच्या घरी राहत असते. आता सईचा रुसवा घालवण्यासाठी मुक्ताने एक नवी युक्ती शोधून काढली आहे. लाडक्या लेकीसाठी ती नवीन वेश धारण करणार आहे.मुक्ता वृद्ध गोदा मावशीचा वेश धारण करुन सावनीच्या घरी सईला भेटण्यासाठी जाणार आहे. नऊवारी साडी, कपाळावर ठसठशीत कुंकू, चष्मा, गळ्यात लहान मंगळसूत्र असा लूक करून मुक्ता सावनीच्या घरी एन्ट्री घेणार आहे.हा नवा लूक साकारण्यासाठी मुक्ता म्हणजेच अभिनेत्री स्वरदा ठिगळे फारच उत्सुक आहे. ती म्हणाली, “पहिल्यांदाच मी अशाप्रकारची भूमिका साकारत आहे. गोदा हे नवं पात्र साकारण्यासाठी माझी ४ वेळा लूक टेस्ट झाली. संपूर्ण टीमने हा लूक साकारण्यासाठी बरीच मेहनत घेतली आहे.

## त्यांनी थोडी गुन्हा केला

बॉलीवूड अभिनेता अरबाज खान काही दिवसांपासून चर्चेत आहे अरबाज खानने 24 डिसेंबर रोजी मेकअप आर्टिस्ट शूरा खानसोबत दुसरे लग्न केले आहे. हा निकाह बहीण अर्पिता खानच्या मुंबईतील घरी पार पडला आहे. या आनंदात सामील होण्यासाठी अरबाज खानचा मोठा भाऊ आणि बॉलिवूडचा सुपरस्टार सलमान खानसह त्याचे संपूर्ण कुटुंब उपस्थित होते. तर अरबाजचा मुलगा अरहानही त्याच्या लग्नात नाचताना दिसला. अरबाद आणि शूराच्या लग्नाचे फोटो आणि व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत. अरबाज आणि शूराने त्यांच्या नात्याबद्दल मौन पाळले होते. कुणाला या लग्नाची कल्पना नव्हती. आता अरबाजचे वडील सलीम खान यांनी मुलाच्या लग्नानंतर प्रतिक्रिया दिली आहे. लग्न करणे हा कोणताही गुन्हा नाही. त्यांच्या निर्णयामुळे आम्ही सर्वच आनंदी असल्याचे त्यांनी सांगितले. न्यूज 18 शी बोलताना सलीम खान म्हणाले की, "त्यांनी लग्न करण्याचा निर्णय घेतला.

## तमन्नाचं ब्रेक अप?



प्रसिद्ध अभिनेत्री तमन्ना भाटिया आणि विजय वर्मा हे दोघंही एकमेकांना दोन वर्षांपासून डेट करत होते. मात्र आता या दोघांमधलं नातं संपुष्टात आलं असून त्यांनी फक्त चांगले मित्र म्हणून राहण्याचा निर्णय घेतला आहे अशी माहिती काही अंतर्गत सूत्रांनी दिली आहे.तमन्ना आणि विजय वर्मा यांच्या एका निकटवर्तीयाने इंडिया टुडे डिजिटलला सांगितलं की या दोघांचं ब्रेक अप झालं आहे. दोघांनी फक्त मैत्री कायम ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. बाकी एकमेकांना डेट करणं थांबवलं असून प्रेमसंबंधही संपवले आहेत. लस्ट स्टोरीज २ या वेब सीरिजमध्ये या दोघांचा खूपच बोल्ड सीन होता. त्यावर चर्चाही सुरु झाल्या होत्या. ज्यानंतर या दोघांनीही म्हणजेच विजय वर्मा आणि तमन्नाने एकमेकांना डेट करत असल्याचं मान्य केलं होतं. तमन्ना भाटिया आणि विजय वर्मा अनेक कार्यक्रमांमध्ये एकत्र दिसायचे. तसंच पापाराझींना फोटोंसाठी पोजही द्यायचे. मात्र आता दोन वर्षांनी या दोघांचं नातं संपुष्टात आल्याची चर्चा रंगली आहे. अर्थात याबाबत तमन्ना किंवा विजय वर्मा कुणीही भाष्य केलेलं नाही. आता हे नातं संपल्याची घोषणा तमन्ना आणि विजय वर्मा याबाबत अधिकृत घोषणा कधी करणार हे पाहणं महत्त्वाचं असणार आहे. अनेक दिवसांपासून विजय वर्मा आणि दोघेही अनेक ठिकाणी एकत्र दिसलेले आहेत.तमन्ना भाटिया आणि विजय वर्मा हे दोघंही मागच्या दोन वर्षांपासून एकमेकांना डेट करत होते. पिंकव्हिला न्यूज या पोर्टलला मिळालेल्या माहितीनुसार तमन्ना भाटिया आणि विजय वर्मा दोघंही एकमेकांपासून आठवड्याभरापासून वेगळे झाले आहेत.

## पप्पांना पद्मश्री, मम्माला जीवनगौरव



महाराष्ट्रभूषण अशोक सराफ यांना काही दिवसांपूर्वीच यंदाचा पद्मश्री पुरस्कार जाहीर करण्यात आला. तर, त्यांच्या पत्नी ज्येष्ठ अभिनेत्री निवेदिता सराफ यांना नुकत्याच पार पडलेल्या ‘झी चित्र गौरव’ पुरस्कार सोहळ्यात यंदाचा जीवनगौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला. याच पार्श्वभूमीवर अभिनेत्री सायली संजीवने तिच्या लाडक्या मम्मा-पप्पांचं कौतुक केलं आहे. अशोक व निवेदिता सराफ हे दोघं ‘काहे दिया परदेस’ फेम अभिनेत्री सायली संजीवला आपली मुलगी मानतात. सायली व निवेदिता यांनी नुकतीच एकत्र ‘स्टार परिवार पुरस्कार’ सोहळ्याला उपस्थिती लावली होती. यावेळी निवेदिता यांनी लाडक्या लेकीला पाहून लगेच तिला मिठी मारली. यानंतर दोघींनी आपल्या भावना व्यक्त केल्या.आपल्या मम्मा-पप्पांना मिळालेल्या पुरस्काराबद्दल सायली संजीव म्हणते, “मला खरंच खूप जास्त छान वाटतंय. सर्वांसाठीच ही खूप जास्त अभिमानाची गोष्ट आहे. कारण, पप्पांना पद्मश्री मिळाला. त्यानंतर मम्माला जीवनगौरव मिळाला. खरं सांगायचं झालं तर, ती माझी मम्मा पण वाटत नाही...इतकी ती तरुण दिसते. ती सध्या खूप काम करतेय. तिच्याकडून अनेक गोष्टी शिकण्यासारख्या आहेत. ती मालिका करते, चित्रपटांच्या प्रमोशनला उपस्थित असते. याशिवाय सिनेमाच्या प्रीमियरला जाते...ती सगळं काही करते.”“माणूस म्हणून ती सगळ्यांसाठी २४ तास उपलब्ध असते. तुम्हाला कसलीही गरज भासली तरी, तुम्ही तिला कधीही फोन करू शकता. फोन करा, मेसेज करा... ती कायम सगळ्यांच्या मदतीसाठी तत्पर असते. मी हे फक्त तिची मुलगी म्हणून बोलत नाहीये...मम्मा सर्वांसाठी असते.” असं सायलीने ‘तारांगण’शी संवाद साधताना सांगितलं. अशोक सराफ यांना पहिल्यांदा सायली संजीव एका चित्रपटाच्या म्युझिक लॉन्चला भेटली होती. हा किस्सा सांगताना अभिनेत्री म्हणाली होती, “मी माझ्या वडिलांना बाबा म्हणायचे. अशोक सराफ सरांनी मला स्वतःहून सांगितलं की, मग तू मला ‘पप्पा’ म्हणत जा. ‘काहे दिया परदेस’मध्ये त्यांनी मला पाहिलं होतं.

## रुबिना दिलैकचा फराह खानला चिकन न खाण्याचा सल्ला

सिनेमा दिग्दर्शक आणि फूड तसंच इतर रिॲलिटी शोची परीक्षक फराह खान आता सोशल मीडियावरही सक्रिय झाली आहे. फराह अनेकदा तिच्या युट्यूब चॅनलवर प्रसिद्धी बॉलिवूड आणि टीव्ही सेलिब्रिटींसह ती स्वयंपाकाचे व्हिडीओ पोस्ट करत असते. विकी आणि अंकिता लोखंडे यांच्या घरातला व्हिडीओ व्हायरल झाला होता. तसंच रुबिना दिलैकसह फराहने एक व्हिडीओ पोस्ट केला आहे. यावेळी रुबिनाने फराह खानला नॉनव्हेज खाऊ नकोस माझं आयुष्य उद्ध्वस्त झालं आहे नॉनव्हेज खाऊन असं म्हणत एक सल्ला दिला आहे.“अभिनव आणि मी सात वर्षांपासून मांसाहार, विशेषतः चिकन खाणं बंद केलं आहे. खरंतर, सुरुवातीला जेव्हा आम्ही दोघंही व्यायाम करायचो, तेव्हा आमचे हातपाय सुजायचे आणि आमचे तळवे जास्त दुखायला लागायचे. त्यावेळी आम्हाला खूप अस्वस्थ वाटायचं. नॉनव्हेजमुळे माझं आयुष्य उद्ध्वस्त झालं होतं.



मग अभिनव आणि मी चिकन सोडण्याचा निर्णय घेतला आणि चिकन सोडल्यानंतर आम्हाला स्वतःमध्ये चांगले बदल जाणवू लागले.” असं रुबिनाने सांगितलं. रुबिनाने पुढे फराह खानला सांगितले की जर तू मांसाहार करणं बंद केलंस तर तुझ्या शरीरात अनेक सकारात्मक बदल दिसून येतील. फराह खानला नॉनव्हेज आवडतं ती ते सोडेल की नाही माहीत नाही पण तिने रुबिनाला विचारलं की मी मासेही खाऊ नयेत का? त्यावर रुबिना म्हणाली तुला आवडत असेल तर तू मासे खाऊ शकतेस. पण तू चिकन खाणं बंद कर.

आता रुबिनाचा हा सल्ला फराह खान मान्य करणार असं दिसतं आहे. कारण फराह खानने तिच्या शेफला म्हणजेच दिलीपलाही सांगितलं की चिकनचा जास्त अंतर्भाव जेवणात करु नकोस. रुबिनाने दिलेल्या सल्ल्याचा विचार करून फराह खान म्हणाली की, ती पुढे जाऊन नक्कीच चिकन सोडण्याचा प्रयत्न करेन तसेच फराहने तिचा शेफ दिलीपलाही समजावून सांगितलं की आतापासून त्याने जेवणात कमी चिकन शिजवावं. खरंतर, फराह खान बनवत असलेले यखनी पुलाव आणि रोस्ट चिकन हे पदार्थ बॉलिवूड सेलिब्रिटींना खूप आवडतात. आता फराह चिकन पूर्ण बंद करणार असेल.

# भारताचा ऑस्ट्रेलियावर विजय!

## इंडियाने घेतला बदला अन् चॅम्पियन्स ट्रॉफी फायनलमध्ये धडक

।नवी दिल्ली।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**विराट कोहलीच्या ८४ धावा, विराट-श्रेयसची ९४ धावांची भागीदारी, हार्दिकचे दोन षटकार आणि राहुलच्या विजयी षटकारासह भारताने ऑस्ट्रेलियाकडून आयसीसी स्पर्धांच्या पराभवाचा बदला घेत दणदणीत विजय नोंदवला आहे. भारताने उत्कृष्ट फलंदाजी आणि गोलंदाजीसह ऑस्ट्रेलियाला नमवत शानदार विजय मिळवला आहे. यासह भारताने ऑस्ट्रेलियावर ४ विकेट्सने मोठा विजय मिळवत अंतिम फेरीत धडक मारली आहे.**





टीम इंडियाने चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ च्या अंतिम फेरीत धडक मारली आहे. दुबईत खेळल्या गेलेल्या पहिल्या उपांत्य फेरीत भारतीय संघाने ऑस्ट्रेलियाचा ५ विकेट राखून पराभव करत सलग तिसऱ्यांदा अंतिम फेरीत धडक मारली. टीम इंडियाच्या विजयाचे हिरो मोहम्मद शमी आणि विराट कोहली ठरले. तर विराट कोहली सामन्याचा सामनावीर ठरला.ऑस्ट्रेलियाने भारताला विजयासाठी २६५ धावांचे आव्हान दिले होते. धावांचा पाठलाग करताना भारताने सुरूवातीला २ विकेट्स गमावले होते. पण नंतर विराट कोहली आणि श्रेयस अय्यरने ९८ धावांची भागीदारी करत संघाचा डाव सावरला. यासह भारताला सामन्यात कायम ठेवलं. विराट कोहली पाच चौकारांसह ९८ चेंडूत ८४ धावा करत बाद झाला. विराटने उत्कृष्ट फलंदाजी करत सर्वाधिक धावा एकेरी धाव घेत काढल्या आणि ऑस्ट्रेलियावर दबाव वाढवला. तर श्रेयस अय्यरने ४५ धावांची खेळी केली. तर अक्षरने २७ धावांची खेळी केली. तर हार्दिकने अखेरच्या षटकांमध्ये शानदार ३ षटकार आणि एक चौकार लगावत संघाचा विजय सोपा केला आणि २८ धावांची खेळी करत बाद झाला. तर केएल राहुल ४२ धावा करत नाबाद परतला.तत्पूर्वी, ऑस्ट्रेलियाने नाणेफेक जिंकत प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. कांगारू संघाकडून कर्णधार स्टीव्ह स्मिथ आणि अॅलेक्स कॅरी वगळता इतर कोणत्याही फलंदाजाला मोठी खेळी करता आला नाही. स्टीव्ह स्मिथने ९६ चेंडूत ७३ धावांची खेळी केली.

### स्मिथची 96 चेंडूत 73 धावांची खेळी

तर अॅलेक्स कॅरीनेही ५७ चेंडूत ६१ धावांची महत्त्वपूर्ण खेळी केली. भारताच्या गोलंदाजांनी कायम भारताला सामन्यात ठेवत संघाच्या विजयाच्या पाया रचला.उर्वरित फलंदाजांपैकी एकाही फलंदाजाला ५० धावांचा टप्पा ओलांडता आला नाही. याचे कारण भारतीय गोलंदाजांनी चांगली गोलंदाजी केली. मोहम्मद शमीने १० षटकांत ४८ धावांत तीन विकेट घेतले, तर वरुण चक्रवर्ती आणि रवींद्र जडेजाने प्रत्येकी दोन विकेट घेतले. हार्दिक पंड्या आणि अक्षर पटेल यांना प्रत्येकी एक विकेट मिळाली. कुलदीप यादव हा एकमेव गोलंदाज होता ज्याला एकही विकेट मिळाली नाही. वर्ल्ड कप २०११ च्या उपांत्यपूर्व फेरीत टीम इंडियाने ऑस्ट्रेलियाचा पराभव करून उपांत्य फेरीत धडक मारली आणि त्यानंतर विजेतेपदही पटकावले होते. यावेळी टीम इंडिया जेतेपदाच्या जवळ आली आहे.

## भारताच्या विजयाचा पाकिस्तानला धक्का!

## यजमान देशात होणार नाही चॅम्पियन्स ट्रॉफीचा अंतिम सामना

।नवी दिल्ली।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भारतीय क्रिकेट संघाने शानदार कामगिरी करत चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ च्या अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. चॅम्पियन्स ट्रॉफीच्या उपांत्य फेरीत भारताने ऑस्ट्रेलियाचा ४ विकेट्स राखून पराभव करत कांगारूंना स्पर्धेतून बाहेरचा रस्ता दाखवला. या विजयामुळे आणि भारताने अंतिम फेरी गाठल्याने पाकिस्तान क्रिकेट बोर्डाला मोठा धक्का बसला आहे.**



चॅम्पियन्स ट्रॉफीचे यजमानपद पाकिस्तानकडे आहे, मात्र आता या स्पर्धेचा अंतिम सामना पाकिस्तानमध्ये होणार नाही, हेही निश्चित झालं आहे. आयसीसी स्पर्धेचे यजमानपद भूषवणाऱ्या देशात जेतेपदाचा सामना होणार नाही, यापेक्षा मोठी गोष्ट काय असू शकते. भारताच्या विजयामुळे पाकिस्तानच्या सर्व तयारीवर पाणी फेरलं आहे. रोहित शर्माच्या नेतृत्वाखाली टीम इंडिया आता ९ मार्चला होणाऱ्या अंतिम फेरीत पोहोचली आहे. आयसीसीने आधीच ठरवलं होतं की जर भारतीय संघ चॅम्पियन्स ट्रॉफीच्या फायनलमध्ये पोहोचला तर फायनल पाकिस्तानमध्ये होणार नाही. पाकिस्तान या स्पर्धेचे यजमानपद भूषवत असले तरीही बीसीसीआयने टीम इंडियाला पाकिस्तानात पाठवण्यास नकार दिला होता, संघातील खेळाडूंच्या सुरक्षेचा विचार करून हा निर्णय घेण्यात आला होता.भारताने आपले तिन्ही साखळी सामने दुबईत खेळले आणि भारत विरुद्ध ऑस्ट्रेलिया उपांत्य फेरीचा सामनाही याच स्टेडियमवर खेळला गेला. त्यामुळे आता चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ चा अंतिम सामना दुबईत खेळवला जाणार आहे. दुसऱ्या उपांत्य फेरीतील दक्षिण आफ्रिका वि. न्यूझीलंडच्या सामन्यानंतर भारताचा अंतिम फेरीतील प्रतिस्पर्धी संघ निश्चित होईल. आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफीचे वेळापत्रक जाहीर केले तेव्हाच नमूद केले होते की उपांत्य फेरी लाहोरच्या गद्दाफी स्टेडियमवर आणि भारताची उपांत्य फेरी दुबईत होईल असे सांगण्यात आले. भारत फायनलमध्ये पोहोचल्यास जेतेपदाचा सामनाही दुबई इंटरनॅशनल स्टेडियमवर होईल, असेही सांगण्यात आले. पण जर भारतीय संघ अंतिम फेरीत जाऊ शकला नाही तर अंतिम सामना लाहोरमध्येच खेळवला जाईल.

### विराट कोहलीने घडवला इतिहास

टीम इंडियाच्या विजयामुळे आता फायनलचे ठिकाणही निश्चित झाले आहे.विराट कोहलीने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये अनेक मोठे विक्रम आपल्या नावे केले आहेत. पण हे सर्व विक्रम विराटने बॅटने धावा करत आहेत. पण आता किंग कोहलीने क्षेत्ररक्षण करतानाही एक मोठा विक्रम आपल्या नावे केला, जो कोणत्याच भारतीय खेळाडूला आजवर करता आलेला नाही. विराट कोहलीने दुबईच्या मैदानावर फलंदाजी न करताही इतिहास घडवला आहे. विराट आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये भारताकडून सर्वाधिक झेल घेणारा खेळाडू बनला आहे.
त्याने राहुल द्रविडचा विक्रम मोडीत काढला आहे. रवींद्र जडेजाच्या चेंडूवर जोश इंग्लिसचा झेल घेत विराटने ही कामगिरी केली. टीम इंडियाच्या स्टार फलंदाजाने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये आतापर्यंत ३३६ झेल घेतले आहेत.उपांत्य फेरीसारख्या मोठ्या सामन्यात विराट कोहलीने ऑस्ट्रेलियाचा यष्टिरक्षक फलंदाज जोश इंग्लिसचा झेल घेत मोठी कामगिरी आपल्या नावे केली. विराटने जागतिक क्रिकेटमध्ये पुन्हा एकदा खळबळ उडवून दिली. विराटने आपल्या ५४९व्या सामन्यात भारतासाठी सर्वाधिक झेल टिपण्याची ही ऐतिहासिक कामगिरी केली आहे.अलीकडेच विराट एकदिवसीय सामन्यांमध्ये भारतासाठी सर्वाधिक झेल घेणारा खेळाडू ठरला होता,

स्मार्ट PCMC SMART CITY
# महाईन्यूज™
ePaper
। बुधवार ।
। दि. 5 मार्च 2025।
epaper.mahaenews.com
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

## उघड्यावर डंम्पिंग, ठेकेदाराची मनमानी चव्हाट्यावर

# मोशी येथील कचरा डेपोवर पुन्हा आग!

## महापालिका पर्यावरण विभागाचा भोंगळ कारभार

। पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी । महाईन्यूज

**विराट कोहलीच्या ८४ धावा, विराट-श्रेयसची ९४ धावांची भागीदारी, हार्दिकचे दोन षटकार आणि राहुलच्या विजयी षटकारासह भारताने ऑस्ट्रेलियाकडून आयसीसी स्पर्धांच्या पराभवाचा बदला घेत दणदणीत विजय नोंदवला आहे. भारताने उत्कृष्ट फलंदाजी आणि गोलंदाजीसह ऑस्ट्रेलियाला नमवत शानदार विजय मिळवला आहे. यासह भारताने ऑस्ट्रेलियावर ४ विकेट्सने मोठा विजय मिळवत अंतिम फेरीत धडक मारली आहे.**



पिंपरी चिंचवड महापालिका पर्यावरण विभागाचा भोंगळ कारभार पुन्हा एकदा चव्हाट्यावर आला आहे. मोशी कचरा डेपोमध्ये संपूर्ण शहराचा कचरा आणला जातो. या ठिकाणी ठेकेदाराकडून उघड्यावर कचऱ्याचे डम्पिंग होत असताना महापालिका पर्यावरण विभाग मात्र डोळ्यावर पट्टी बांधून ठेकेदाराची मनमानी गपगुमान सहन करत असल्याचे चित्र आहे. उघड्यावर टाकलेल्या या कचऱ्याने मंगळवारी पेट घेतला. रात्री उशिरापर्यंत या कचऱ्याची आग धुमसत होती.

घटनेची माहिती मिळताच, मुख्य अग्निशमन दलासह भोसरी येथील पथकही मोशी येथे पोहोचले. अग्निशामक दलाच्या तीन गाड्या घटनास्थळी दाखल होत्या. दुपारी साडेचारच्या सुमारास लागलेली आग उशिरापर्यंत धुमसत होती.पाण्याचा मारा करुनही आगीवर नियंत्रण मिळविता येत नव्हते. आग आटोक्यात आणण्यासाठी रात्री उशिरापर्यंत अथक प्रयत्न केले जात होते. अखेरीस पर्यावरण विभागाकडून या कचऱ्याला लागलेल्या आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी माती टाकून आग विझवण्याच्या सूचना रण्यात आल्या. दरम्यान कचऱ्याला लागलेली आग ही उन्हामुळे लागला असल्याचा अंदाज महापालिका प्रशासनाने वर्तवला आहे. उन्हाळ्यामुळे तापमान वाढल्याने कचऱ्याच्या ढिगाऱ्याखाली मिथेन वायुची निर्मिती होते.

### कचऱ्याच्या आगीचे गौडबंगाल?

पिंपरी चिंचवड़ महापालिकेच्या मोशीतील कचरा डेपोला आग लागण्याचे प्रकार सातत्याने घडतात. आग लागण्याचे कारण नैसर्गिक आहे की हेतुपुरस्सर आग लावण्याचा मानव निर्मित प्रयत्न होतात यासाठी द्विसदस्यीय समिती देखील गठीत केली गेली होती. 2018, 2019, 2022 अशा सलग तीन वर्ष कचरा डेपो मध्ये कचऱ्याला आग लागण्याच्या घटना घडल्या होत्या. या प्रकारामुळे वायु प्रदूषणाचा मोठा मुद्दा उपस्थित करण्यात आला होता. आता पुन्हा कचरा डेपोत उघड्यावर कचरा टाकल्यामुळे आग लागण्याचा प्रकार समोर आला आहे. प्रशासन याबाबत ठेकेदारांनी विरोधात कोणती भूमिका घेते हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

> “मोशी कचरा डेपो मध्ये मंगळवारी कचऱ्याला लागलेली आग ही उन्हामुळे लागली आहे. याबाबत ठेकेदाराची चूक आहे का याची चौकशी केली जाईल. आग लागलेल्या कचऱ्यावर माती टाकून आग आटोक्यात आणण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.
>
> -संजय कुलकर्णी, मुख्य अभियंता, पर्यावरण विभाग

---

# तंत्रज्ञान विकसित होताना मानवी मेंदूचे महत्त्व विसरता कामा नये : डॉ. अभ्यंकर

## शिक्षण विश्व: प्रतिभा कॉलेज ऑफ कॉमर्स अँड कॉम्प्युटर स्टडीजतर्फे विज्ञान दिनानिमित्त कार्यशाळा

। पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी । महाईन्यूज

**जगभरामध्ये मोठ्या प्रमाणात तंत्रज्ञान विकसित होत आहे. विकसित होणारे तंत्रज्ञान काळाबरोबर आत्मसात करणे ही गरज बनत चालली आहे मात्र तंत्रज्ञानाबरोबरच मानवी मेंदूची उपयुक्तता आणि महत्व विसरता कामा नये असे आवाहन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील तंत्रज्ञान विभाग प्रमुख व अभ्यासक वक्ते डॉ. आदित्य अभ्यंकर यांनी केले.**



चिंचवड येथील कमला एज्युकेशन सोसायटी संचालित प्रतिभा कॉलेज ऑफ कॉमर्स अँड कॉम्प्युटर स्टडीज च्या वतीने महाविद्यालयात शास्त्रज्ञ सी .व्ही . रामन यांच्या राष्ट्रीय विज्ञान दिनाचे औचित्य साधून विद्यार्थी व प्राध्यापकासाठी संस्थेचे सचिव डॉ दीपक शहा यांच्या मार्गदर्शनाखाली कृत्रिम बुद्धिमत्ता, त्याची साधने व उपयुक्तता या विषयावर एक दिवशीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. त्याचे उद्घाटन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील तंत्रज्ञान विभागाचे डीन व अभ्यासक वक्ते डॉ. आदित्य अभ्यंकर यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अरुणकुमार वाळुंज होते. त्यांच्या समवेत व्यासपीठावर यावेळी उपप्राचार्या डॉ. क्षितिजा गांधी, विभाग प्रमुख डॉ. जयश्री मुळे, डॉ. राजश्री ननावरे, प्रा. जयश्री कांबळे उपस्थित होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अरुणकुमार वाळुंज यांच्या हस्ते प्रमुख वक्ते डॉ. आदित्य अभ्यंकर यांच्या शाल व स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.कार्यशाळेचे सूत्रसंचालन प्रा. रसिका पाटील यांनी केले. स्वागतपर मनोगत उपप्राचार्या डॉ. क्षितिजा गांधी यांनी केले तर आभार प्रा. जयश्री कांबळे यांनी मानले . प्राध्यापक व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना डॉ. आदित्य अभ्यंकर म्हणाले, कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) रोबोट्स कसे काम करते. त्याचा वापर कसा करता येईल, या बाबतीत माहीती देताना म्हणाले आपल्याला हे नवीन तंत्रज्ञान आत्मसात करणे काळाची गरज आहे .त्याचे प्रमुख कारण जगभरात नवनवीन तंत्रज्ञान विकसित होत आहे. ते आपण शिकून आत्मसात केले नाही तर , भविष्यात दिवसें गणित आपल्याला अवघड होत जाईल .यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता ( एनआय ) रोबोट्स, त्याची साधने व त्याची उपयुक्तता याबाबतीत सखोल ज्ञान प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी घेतलेच पाहिजे . ही काळाचीच देखील गरज आहे.

### तंत्रज्ञान ताब्याबाहेर जाता कामा नये

डॉ.अभ्यंकर यांनी आर्टिफिशियल इंटेलिजन्स यांच्या संभाव्य धोक्याबद्दल देखील सतर्क केले. ते म्हणाले, आज कृत्रिम बुद्धिमत्ता रोबोट्स वापरताना आपल्याकडील नैसर्गिक बुद्धिमत्ता मानवी मेंदूचा वापर कमी होत चाललेला आहे .हा एक धोका देखील आहे . तसेच भविष्यात जर ही सर्व यंत्रे , नवीन तंत्रज्ञान मानवी नियंत्रणाच्या ताब्याबाहेर गेली तर , त्यावर नियंत्रण मिळविणे देखील अवघड होईल. मग धोकादायक परिस्थिती निर्माण होईल. यासाठी नव्या युगात कार्यरत असताना आपली नैसर्गिक बुद्धिमत्ता मानवी मेंदू घासून पुसून जागरूकपणे स्वच्छ ठेवण्याची देखील आवश्यकता आहे .असे सांगून डॉ. अभ्यंकर पुढे म्हणाले, वैज्ञानिक जगासमोर आपली मते मांडताना म्हणतात, संशोधनासारखे पवित्र व शुद्ध दुसरे काहीच नाही त्यातूनच ज्ञान प्राप्ती मिळू

# मास्टर माईंड ग्लोबल कॉलेजचे
# वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात!

## शिक्षण विश्व : विविध सांस्कृतिक कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद

। पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी । महाईन्यूज

**भोसरी येथील मास्टर माईंड स्कूलचा दोन दिवसीय वार्षिक सांस्कृतिक कार्यक्रम उत्साहात साजरा झाला. कार्यक्रमाचे आयोजन संत तुकाराम बँक्वेटस हॉल भोसरी येथे करण्यात आले होते.**




स्नेहसंमेलनाचे प्रमुख आकर्षण कौटंबिक नातेसंबंध, तसेच विविध ऐतिहासिक योद्धे ,शेतकरी यांना आदरांजली हे ठरले अशा विविध सादरीकरणातून सामाजिक संदेश देण्यात आले. कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी पी.के.इंटरनेशनल स्कूल चे चेअरमन सोमनाथ काटे, तसेच संचालक जगन्नाथ काटे, मास्टर माईंड शाळेचे विश्वस्त जयश्री गवळी, संकेत गवळी, मणीकंदन नायर, विद्यालयाच्या मुख्याध्यापिका डॉ. प्रदीपा नायर आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर करत आपल्या कलागुणांचा आविष्कार केला. नर्सरी ते नववी पर्यंतच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या विविध नृत्यांना, गाण्यांना प्रेक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

### गुणवंत विद्यार्थी-शिक्षकांचा सन्मान..

महाविद्यालयातील गुणवंत विद्यार्थ्यांना, शिक्षकांना तसेच कर्मचाऱ्यांना पारितोषिक देऊन गौरविण्यात आले . शाळेच्या प्राचार्या डॉ. प्रदीपा नायर यांनी विद्यालयाच्या संपूर्ण अहवालाचे वाचन केले. या दोन दिवसीय कार्यक्रमास शाळेचे विद्यार्थी, शिक्षक तसेच पाच हजार हून अधिक पालक उपस्थित होते. अशाप्रकारे आनंदी व उत्साही वातावरणात कार्यक्रम संपन्न झाला. वंदे मातरम् या गीताने कार्यक्रमाची सांगता झाली.




Golden opportunity for Pune & PCMC student's
GURUKUL
ONLINE
CLASSES
YOUR CHILD'S FUTURE
IS OUR PRIORITY
Nursary to 7th
All Subjects, Only Special
Subject Available..
Math's, EVS, All language
Admission Open
Batch Starts 7th June 2023
MORE INFO
96577 67000 / 70209 85375
EXPRESS MEDIA ENTERPRISES
आजच प्रवेश निश्चित करा...आणि निश्चिंत रहा..!


Express
Media Enterprises
Professional Live set up with live drone available..
• Documentary
• Weddings
• Drone
• Motion Graphics
• Testimonials
• Tutorial videos
• Product Videos
• Animation
• Social Media Content
• Promotional Videos
• Real Estate
• Corporate
• Advertising
• Events
PUNE
Contact: 9657767000/9370493922/9664188046